- HINDI
- MATHS
- ENGLISH
- MARATHI
- PHYSICS
- CHEMISTRY
- PHILOSOPHY
- BIOLOGY
- ENGINEERING
- INFORMATION TECHNOLOGY
- LIFE SCIENCES
- COMMERCE
- MANAGEMENT
- BUSINESS ORGANISATION
- SOCIOLOGY
- AGRICULTURE
- PUBLIC ADMINISTRATION
- HOME SCIENCE
- HUMAN SCIENCE
- MUSIC
- POLITICAL SCIENCE
- LAW
- ECONOMICS
- GEOGRAPHY
- EDUCATION
- HISTORY
- MILITARY SCIENCE
- COMPUTER
- PSYCHOLOGY
- HUMANITIES & SOCIAL SCIENCES
- LANGUAGES
- MANAGEMENT

ISSN 2395-759X

ISSN 2395-759X

स्वत्वधिकारी, मुद्रक, प्रकाशक एवं संपादक – प्रा. मयुर बंडू लहाने द्वारा आकांक्षा टंकलेखन बहुउद्देशीय संस्था [illegible] प्रकाशित

RNI-MAHMUL/2015/74000

ISSN : 2395-759X

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject, Monthly Research Journal

Vol. VI ■ Issue X ■ October 2020

Impact Factor : 5.025

# Akanksha...

New Directions & Challenge

आकांक्षा...

नई दिशा और आव्हाने।

# आकांक्षा...

नवी दिशा आणि आव्हाने.

■ Editor - In - Chief

*Prof. Mayur Bandu Lahane*

Published by :- Akanksha Tankalekhan Multipurpose Society

Ne[illegible]m Mandir, Path Pura, Hiwarkhed (Rup.), Tq. Telhara, Dist. Akola, (MH) 444

AKANKSHA..... New Directions & Challenges

आकांक्षा.... नवी दिशा आणि आव्हाने

आकांक्षा..... नई दिशा और आव्हाने

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject, Monthly Research Journal.

**Issue**
Octomber 2020

**RNI No.**
MAHMUL/2015/74000

**ISSN**
2395-759X

**Editor-In-Chief**
Prof. Mayur B. Lahane
Cont :- 9096593842
Email :- akankshajournal@gmail.com
lahane_mayur@rediffmail.com

**Date of Publication**
25th of Every Month

**Owner, Printer's, Publisher Name**
Prof. Mayur Bandu Lahane

**Printed & Published At**
Akanksha Tankalekhan Multipurpose Society,
Near Ram Mandir, Peth Pura, At.Post. Hiwarkhed (rup)
Tq. Telhara Dist. Akola Maharashtra 444103.

**Single Issue Price**
100/-

© All Rights are reserved with the publisher. The opinion expressed are of the authors and the Publisher, Editor-in-Cheif, Editorial Board, as well as the peer's committee, Peer Review committee does not hold any responsibility for any of the views expressed.

© नियतकालीक मते, संदर्भ, घटना, व अन्वयार्थ हे लेखकाचे स्वतंत्र संशोधन लेखन आहे. या बाबीशी प्रकाशक, मुख्य संपादक, संपादक मंडळ, सल्लागार समिती, समीक्षक मंडळ सहमत असेलच असे नाही

© मुख्य सम्पादक – प्रा. मयुर लहाने का मानद पद एवं कार्य पूर्णत: अवैतनिक है । इस शोध पत्रिका के प्रकाशन, सम्पादन, एवं मुद्रण में पूर्णत: सावधानी बरती गई है। किसी भी प्रकार की त्रुटि सहज मानवीय भूल मानी जाए । त्रुटी हेतु सम्पादक, प्रकाशक एवं मुद्रक जिम्मेदार नहीं होगा ।

---

**NATIONAL INSTITUTE OF SCIENCE COMMUNICATION AND INFORMATION RESOURCES**
**(Council of Scientific and Industrial Research)**
**14, Satsang Vihar Marg, New Delhi 110 067**

निस्केयर NISCAIR

ISSN INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA

**G. Mahesh, Ph.D.**
**Head, National Science Library**
**Phone: 91-11-26863759**
E-mail: gmahesh@niscair.res.in website: http://nsl.niscair.res.in

**NSL/ISSN/INF/2015/1182** **Dated: May 29, 2015**

**Mayur Bandu Lahane**
**Akansha Tankalekhan Multipurpose Society**
**Hiwarkhed (Rup) Tq. Telhara**
**Dist. Akola 444 103**

**Dear Sir/Madam,**
महोदय /महोदया

**We are happy to inform you that the following serial(s) published by you has been registered and assigned ISSN (Print)**

हमे आपको यह सूचित करते हुए प्रसन्नता हो रही है कि निम्नलिखित प्रकाशन पंजीकृत कर लिए गये है एवं (प्रिंट) आई.एस.एस.एन. आबंटित कर दिये गये है

**ISSN 2395-759X** **Akansha....Navi Disha ani Aavhane**
आकांक्षा ....नवी दिशा अणि आवन्हे

**It is important that the ISSN should be printed on every issue preferably at the right hand top corner of the cover page.**
प्रकाशन की प्रत्येक प्रति के कवर पेज के दाहिने और के ऊपरी सिरे पर आई.एस.एस.एन. छपा होना आवश्यक है।

**We will be responsible for monitoring the use of ISSN assigned to Indian Serials and for supplying up to-date data of the same to the International Centre for ISSN, Paris. For this purpose we request you to send us the forth coming issue of your serial on complimentary basis.**

भारतीय राष्ट्रीय केंद्र की जिम्मेदारी होगी कि वह भारतीय पत्रिकाओ को आबंटित आई.एस.एस.एन. की जाच करेगा एवं उद्यतन डाटा की जानकारी इंटरनेशनल सेंटर फॉर आई.एस.एस.एन. पेरिस को भेजेगा। अतः आपसे अनुरोध है कि इस कार्य हेतु प्रकाशन की एक प्रति आई.एस.एस.एन. प्रिंट करके सम्मानार्थ भेट हमे भेजे।

**We solicit your co-operation in this regard.**
आपके सहयोग के लिए हम आभारी रहेंगे।

भवदीय

(जी महेश)

हेड

नेशनल साइंस लाइब्रेरी एवं आई. एस. एस. एन.

## Advisory Committee

**Dr. Vikas Singhal**
Assistant Reginal Director,
Indira Gandhi National Open University,
Nagpur.

**Dr. Pranay R. Malviya**
Principle,
Dr Panjabrao Deshmukh collage of law,
Amravati

**Dr. S. K. Deshmukh**
Principle,
College of Enggneing and Techology,
Akola.

**Dr. Shubhash S. Gawai**
Head, Department of Pol. Science,
Bhartiya Mahavidyalay, Raja Peth,
Amravati.

**Dr. Rama R. Fuke**
Head, Department of Education
Priyadarshini college of Education, Nagpur.

**Prof. Vivek H. Hiware**
Head, Department of English
Shri Shivaji College, Akola

## Peer Committee

**Prof. Ille C. Gebeshuber**
Professer of Physics
Vienna University of Technology
Austria (Europe)

**Prof. Diana L Gustafson**
Faculty of Medicine,
Memorial University of Newfoundland,
Canada

**Dr Richard Clay**
Department of Art History,
University of Birmingham,
Edgbaston UK

**Dr. Mutavalli Maizoddin Mainoddin,**
Depertment of Marathi
Ranichananama University
Belgaon Karnatak

**Dr. Sanjay M. Ayade**
Govt. College of Education Bilaspur,
Chhattisgarh

**Dr. Dilip Alone**
Depertment of Marathi
L T M. College Wani

## Peer Review Committee

**Dr. Vilas V. Tayde**
Depertment of Marathi
Shri Shivaji Arts, Comm. & Science College,
Akot.

**Dr. Kamlakar Payas**
Depertment of Marathi
Takshashila college, Amravati

**Dr. Sunanda K. Reose**
Depertment of Marathi
Shri Pundalik Maharaj Mahavidyalay
Nandura Railway Dist Buldhana

**Dr. Dnyaneshwar S. Shambhrkar**
Head, Department of Pol. Science,
S B Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur

**Dr. G. L. Gulhane**
Head, Department of Education
Sant Gadage Baba Amaravati University
Amravati.

**Dr. Santosh N. Tade**
Head, Depertment of Economics
Shri Narshing College, Akot

**Dr. Basant Tripathi**
Head, Department of Hindi,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur

**Dr. Suvarna Shinde**
Head, Department of English,
Arts & Commerce College for Women
Deopur, Dhule


# Index

**Sr. No.** | **Contents** | **Page No.**


1. ''वाशिम जिल्हयातील माध्यमिक शाळांमधील मुलांचा आहारविषयक दर्जा''
   — डॉ मेघा देशमुख — १–७
2. ''यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामिण लोकसंख्येच्या घनतेच्या बदलत्या प्रारूपाचा भौगोलिक अभ्यास''
   — प्रा. डॉ. प्रतिभा सहारे
   — प्रा. डॉ. सावन एम. देशमुख — ८–१४
3. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती विषयक विचारांची वर्तमान उपयुक्तता''
   — प्रा. मयुर लहाने — १५–२२
4. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान''
   — प्रा. डॉ. सुनंदा रेवसे — २३ – २८
5. *"Art And Music As Approaches To Mental Health"*
   - Jagdish Indalkar — २९–३८

# Index

Sr. No. | Contents | Page No.


1. "वाशिम जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील मुलांचा आहारविषयक दर्जा"
— डॉ मेधा देशमुख १–७
2. "यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामिण लोकसंख्येच्या घनतेच्या बदलत्या प्रकाराचा भौगोलिक अभ्यास"
— प्रा. डॉ. प्रतिभा रहाटे
— प्रा. डॉ. साजन एन. देशमुख ८–१४
3. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती विषयक विचारांची वर्तमान उपयुक्तता"
— प्रा. मयुर लहाने १५–२२
4. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान"
— प्रा. डॉ. सुनंदा रेवसे २३ – २८
5. *"Art And Music As Approaches To Mental Health"*
- Jagdish Indalkar २९–३८



An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue X, Octorber 2020
ISSN 2395-759X


## ४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान


**प्रा. डॉ. सुनंदा रेवसे,**
*श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय,*
*नांदुरा (रेल्वे) जि. बुलढाणा*


डॉ. बाबासाहेब नसते तर... तर... संघर्षाचे बीज कुणी रूजविले असते ? कुणी वेदनांवर फुंकर घातली असती ? ध्येयाचा तारा कुणी दाखविला असता ? कुणी आयुष्याला मोल दिले असते ? कुणी मुक्त श्वास घेण्यासाठी बळ दिले असते ? मानवी स्वातंत्र्याचा अर्थ कुणी सांगितला असता ? विद्रोहाचा सूर कुणी दिला असता ? कुणी जोडले असते मानवी संस्कृतीला इतिहासाचे नवे पान ? १४ ऑक्टोबर १९५६ ची सुंदर, प्रसन्न सकाळ दलितांच्या जीवनात कुणी निर्माण केली असती ? बुद्ध, धम्म आणि संघाचा पावनघोष या भूमीत कुणी निनादित केला असता ? खरंच मूकनायक युगायुगात एकदाच जन्माला येतो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव युग एकदाच धारण करतं

मानवसमाजापुढे महानतेचा वाटा अंथरूण ठेवणारा मानव म्हणजे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणा हीच आपली निष्ठा मानली. बुध्दीवाद हेच तत्वज्ञान मानलं, आणि समाजाच्या नाड्या ओळखून त्यांच्यापुढे उन्नतीचा मार्ग ठेवला. या युगपूरूषाने बहुजनांच्या न्याय हक्कासाठी संस्कृतीविरूध्द महासंग्राम पुकारला. समाजाने त्यांचा सामाजिक न्याय नाकारला, पण त्यांनीच समाजाला माणूसकीचे मर्म समजावून दिले. जणू त्यांनी म्हटले—

''शब्दांची पूजा करीत नाही मी
माणसांसाठी आरती गातो
ज्यांच्या गावांत उजेड नाही
त्यांच्या साठी सूर्य मागतो''

म. फुल्यांचा शैक्षणिक वारसा सर्वतोपरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालवला. एक अविद्या केवढा मोठा अनर्थ घडवू शकते हे डॉ बाबासाहेबापेक्षा चांगले आणखी कोणाला माहिती असेल ? म्हणूनच ज्याला देशीय मूलाधार आहे असे शैक्षणिक तत्वज्ञान त्यांनी प्रतिपादन केले. निरक्षर जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिर्वतनाची तरफ म्हणून आणि सामाजिक अभियांत्रिकीचे हत्यार म्हणून शिक्षणाचा पाठपुरावा केला. त्यांना शिक्षण हे आत्यंतिक ऐहिक हिताचे वाटत होते. शिक्षणाशिवाय जीवनामध्ये दुसरे कोणतेही हित प्राप्त करून घेणे शक्य नाही असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच ते शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हणतात. ते जो घेईल

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue X, Octomber 2020
ISSN 2395-759X

तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असा त्यांचा विश्वास होता. समाजातील विषमता दूर करण्यासाठी त्यांना शिक्षण हा एक राजमार्ग वाटत होता. त्यांनी म्हटले होते कि, शिक्षणाचा हेतू लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकीकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृतिक यांचा शिक्षण हा पाया होता. त्यांचा आग्रह होता की, जातीप्रथेच्या तरबंद्यावर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतलं पाहिजे शिक्षणातील आपल्या लोकांच्या मागासलेपणाची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नेहमी होती. त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी शिक्षणाशिवाय अन्य उपाय नाही. हे त्यांनी पूरते ओळखले होते. म्हणून त्यांना शिक्षण दुधारी शस्त्राप्रमाणे वाटायचे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान हे जनसमान्यासाठी तसेच वंचितासाठी होते. स्वातंत्र्य, समता व बंधूभाव ह्या तीन मानवकल्याणाच्या तत्वास अनुसरून जीवन जगणारा समाज शिक्षणातून निर्माण व्हावा असे त्यांना अत:करणापासून वाटत होते. त्यासाठी ते जीवनभर सातत्यपूर्ण कार्यरत राहिले म्हणूनच तर यशवंत मनोहर बाबासाहेबांना उद्देशून म्हणतात —

"आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस तो सूईदोरा कुठे ठेवलास ? गांजलेल्या जन्मांना नग्कातून ओढून पोटाशी घेतलेम ती माऊलीची माया तू कुणाजवळ ठेवलीस ?"

आज बाबासाहेब असते तर त्यांच्या घरावर नावाची पाटी लावली असती त्यात साऱ्या पदव्याच पदव्या दिसल्या असत्या असा हा पदव्यांचा अलेक्झांडर होता. त्यांच्या अभ्यासिकेत सदैव ज्ञानाचे अग्निहोत्रच पेटलेल असायचं. औरंगाबादचा मिलींद परिसर आणि नागसेन वन, मुबंईचे सिध्दार्थ महाविद्यालय ह्या बाबसाहेबांच्या शैक्षणिक कतृत्वाच्या पताका आहेत. बाबासाहेब ग्रंथ वेडे होते त्यांना हे वेड वडिलोपार्जित प्राप्त झालं होतं. त्यांच्या वडिलांनी त्यांना ग्रंथ पुरविण्यास कधिच कुचराई केली नव्हती. ग्रंथ हेच बाबासाहेबांचे अन्न होते, पक्वान्न होते. ग्रंथाविषयी आपली भावना व्यक्त करताना ते म्हणतात, "सगळ्या जगाने मला दुर लोटले तेव्हा माझ्या ग्रंथांनी मला धिर दिला, दिशा दिली. माझे डोळे जर अंधू झाले तर माझ्या जीवनातील स्वारस्यच संपेल. माझ्या दुर्देवाने कधी घरावर जप्ती आली, दागिणे, मौल्यवान वस्तू कधी लिलावात निघाल्या तरी ते मी सहन करीन पण... माझ्या ग्रंथांना कोणी हात लावला तर मी तो हात कलम करण्यासही मागेपुढे पाहणार नाही." असे हे ग्रंथवेडे बाबासाहेब श्रेष्ठ ग्रंथकार होते या श्रेष्ठ ग्रंथकाराने आपल्या करणी आणि लेखनीचे तसेच वाणीच्या जोरावर जगात विश्वविद्वान बनण्याचा मान पटकावला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व योगदान पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

१. व्यक्तीला जाणीव करून देण्यासाठी शिक्षण
२. शिक्षण एक शस्त्रच



An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue X, Octomber 2020
ISSN 2395-759X

३. विषमता नष्ट करण्यास व सामाजिक लोकशाही साठी
४. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा.
५. समानतेसाठी शिक्षण
६. शिक्षण एक अन्न व शक्ती
७. शिस्त व विकासासाठी
८. शिक्षण मुल्याधिष्ठित
९. शिक्षण एक पवित्र कार्य
१०. समाज परिवर्तनाचे व क्रांतिचे पवित्र साधन
११. स्त्री शिक्षण
१२. विद्येला प्रज्ञा, शील, करूणा आणि मैत्री या परिनीतीची गरज.

डॉ. बाबासाहेबांच्या मते शिक्षणापासून विद्यार्थ्यांमध्ये —

१. विचार करण्याची शक्ती वृद्धिंगत झाली पाहिजे.
२. त्यांच्या ठिकाणी समस्या सोडविण्याची क्षमता आली पाहिजे.
३. त्याला स्वाभिमान जतन करता आला पाहिजे.
४. इतरांना सुधारण्यासाठी त्याने स्वत: आधी सुधारले पाहिजे.
५. स्वावलंबी बनल्याशिवाय त्याला संघटनेचे कार्यक्षेत्र वाढविता येणार नाही. त्यासाठी त्याने स्वत:चा उद्धारकर्ता बनावे. इतरांवर अवलंबून राहता कामा नये.

मुंबई येथे दिनांक १७ डिसेंबर १९३८ रोजी बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांना उपदेश केला की, 'शिकलेल्या मानसात काही दोष असतात. पहिली गोष्ट म्हणजे शिक्षण पूर्ण झाल्यावर मनुष्य स्वत:चे हित पाहातो, समाजाचे पाहत नाही. तो आपल्या बायका पोरांची व स्वत:च्या हिताचीच काळजी घेतो. दुसरी गोष्ट अशी की, शिकलेल्या माणसात कर्तव्यापेक्षा हक्काची जाणीव जास्त उत्पन्न होते. आपले कर्तव्य कोणते, त्याची भावना जागृत होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कलात्मक जीवन जगणार रसिक होते, तसेच भावसपन्न जीवन जगणारे एक प्रापंचिक पण होते. त्यांना सुंदर फाऊंटन पेन्स, नवे शब्दकोश, फिरावयास जाताना हाती घ्यावयाची काठी यांचा संग्रह करणे आवडत असे. दिल्लीतील आपल्या निवासस्थानाला एकाअंगाने राप्रसादाचे आणि दुसऱ्या अंगाने अत्यंत साधे असे रूप दिले होते. बाबांचे अभ्यासिका, स्वयंपाकघर आणि विश्रांतीची खोली अतिशय साधी होती. पण त्यांच्या दिवाणखाना आणि उरलेले घर सदैव सजवलेले असे. एकदा कोणीतरी त्यांना विचारले की,"डॉक्टर साहेब एकाच वेळी हि साधी आणि उच्च अशी दुहेरी राहणी कशासाठी?" डॉक्टर साहेब म्हणाले, "साधेपणा माझ्यासाठी! दिमाख तो माझ्या

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue X, Octomber 2020
ISSN 2395-759X

दलित बांधवांना आत्मप्रत्ययाची स्फूर्ती देण्यासाठी ! आपल्यापैकि एकजण विद्येच्या बळावर अशा ऐश्वर्याचा धनी होतो, हे दलितांच्या ध्यानी यावे याठी !''

कन्फुशियस या तत्ववेत्त्याचे एक वचन बाबासाहेब आपल्या अनुयायांना नेहमी सांगत असे की, 'तुमच्याजवळ दोन आणे असतील तर एका आण्याचे अन्न खरेदी करा, दुसऱ्या आण्याचे एक फुल विकत घ्या. अन्न तुम्हाला जगविन. फुल तुम्हाला जगावयास शिकविन.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या क्रांतीसूर्याला उद्देशून कोणीतरी म्हटले आहे–

''हे सूर्या,
तू निथला आणि मी इथला
चल आपण दोघे मिळून
एक करार करू...
परिवर्तनाचा ठराव करू...
अरे ! तू तार्‍यांना प्रकाशमान कर
मी या सार्‍यांना प्रकाशमान करतो !''

यावरून बाबासाहेबांच्या कार्याचा आवाका लक्षात येतो. सुरेश भट त्यांच्या गौरवार्थ म्हणतात – बाबासाहेब तूमच्या धम्मचक्र प्रर्वतनाने आणि कृतिशीलतेनेच कालचे मुके आज बोलायला लागले. काय सत्य आणि काय असत्य यातील भेद ते जाणायला लागले. ज्ञानाची गंगा समाजाच्या खालच्या थरापर्यत पोहचल्यावाचून देशाचा उद्धार होणार नाही, या भावनेनेच आपले सर्वस्त्र त्यांनी ज्ञानदानाच्या कार्यास वाहिलेले होते.

त्यातूनच त्यांनी पुढील कार्ये केलीत–

१. बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना
२. दलित वर्ग शिक्षण संस्थेची स्थापना
३. शिक्षण व्यवसायात प्रवेश
४. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना
५. राजकीय पक्षाची स्थापना उदा. स्वतंत्र्य मजूर पक्ष, शेडयूल कास्ट फेडरेशन, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी विद्येला शस्त्र म्हटले. त्यामुळे त्याचा जपूनच वापर करणं गरजेचं असते. अस्पृश्य समाजाचे योग्य शिक्षण झाल्यास तो समाज आपल्या हक्काविषयी जागरूक राहिल व ते हक्क प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करील असा त्यांचा विश्वास होता. डॉ. बाबासाहेबांनी अस्पृष्यांच्या उद्‌धारासाठी व शैक्षणिक प्रगतीसाठी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना केली. या सभेची ध्येयं व उद्दिष्टं पुढिलप्रमाणे होती –



An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue X, Octomber 2020
ISSN 2395-759X

१. वसतीगृहे उघडून दलित वर्गात शिक्षणाच्या प्रसाराचे संचालन करणे.
२. वाचनालये, समाजकेंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यासमंडळे उघडून दलित वर्गामध्ये संस्कृतिच्या प्रसाराचे प्रचालन करणे.
३. औद्योगिक आणि कृषीशाळा सुरू करून दलित वर्गाच्या आर्थिक स्थितीमध्ये प्रगती करणे आणि सुधारणा करणे.

इ.स. १९२५ मध्ये बहिष्कृत हितकारीणी सभेने दलित वर्गाच्या हायस्कूल विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे वसतीगृह सुरू केले. विद्यार्थ्यांना लागणारे कपडे, लेखनसामग्री, भोजन याचा खर्च त्यांनी दिला. विद्याथ्र्याच्या मनात ज्ञान आणि विद्या, समाजसेवेची गोडी निर्माण व्हावी म्हणून बहिष्कृत हितकारीणी सभेच्या मार्गदर्शनाखाली 'सरस्वती विलास' नावाचे मासिक काढले. शिवाय मुंबईमध्ये एक मोफत वाचनालय आणि 'महार हॉकी क्लब' सुरू केला. अशा आशेने की, जुगार, मद्यपान, इतर व्यसने आणि करमणूकीचे रोगट मार्ग यापासून अस्पृश्य मुले व समाज दूर रहावा. इ.स. १९३८ मध्ये आपल्या जमातीचे शालेय शिक्षण भक्कम पायावर संघटित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना केली. यावेळी पाच वसतीगृहाच्या योजनेला शासनाने मान्यता दिली. बाबासाहेब या संस्थेचे प्रमुख कार्यवाह होते. ८ जुलै १९४५ रोजी मुंबई येथे निम्न मध्यम वर्गामध्ये आणि विशेषत: अनुसूचित जातीमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढावे म्हणून पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''या शिक्षण संस्थेचा हेतू केवळ शिक्षण देण्याचाच नव्हता, तर शिक्षण अशा रितीने दिले जाईल की त्यामुळे भारतात बौध्दिक, सामाजिक आणि नैतिक लोकशाहीचा प्रचार करता येईल. बहिष्कृत–जनता–मूकनायक–प्रबुध्द भारत हा नियतकालिकांचा प्रवास दलित जनतेचा विकासाचा टप्पा निश्चित करतो.

पिपल्स एज्युकेशन सोसायटीअंतर्गत मुंबई येथे २० जून १९४६ रोजी सिध्दार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सूरू केले. आपल्या जीवन काळात डॉ. बाबासाहेबांनी १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे मिलिंद कला आणि विज्ञान महाविद्यालय स्थापन केले. हे महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण वर्षी सुरू करण्यात आले होते. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होवूनच या महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे ही महाविद्यालये दलितोध्दाराची उगमस्थाने आणि प्रेरणास्थाने बनली होती.

तात्पर्य – अशाप्रकारे एम. ए (कोलंबिया), पीएच.डी (कोलंबिया), डी. एससी. (लंडन), एल. एल. डी. (कोलंबिया), डी. लिट. (उस्मानिया), बार–अॅट–लॉ (लंडन) इ. पदव्या घेवून भारताला ललामभूत करणारे हे विश्वरत्न म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर. यांनी समाजाला प्रज्ञा–शील–करूणा या जीवन तत्वावर आधारित आहे.

जेथे प्रज्ञा आहे. तेथे अंधश्रद्धेला अवसर नाही. माणूस प्रज्ञावंत असेल पण शीलवान नसेल तर प्रज्ञा ही पापाची जननी ठरू शकते. अन्य घटकांविषयी सहानुभूती किंवा आत्मियता नसेल तर आदर्श समाजजीवन अशक्य आहे. तेथे 'बहुजन हिताय–बहुजन सुखाय' हे तत्व राबविले जाणार नाही. यासाठी मानवमुक्तीचा, स्त्रीमुक्तीचा, दास्यमुक्तीचा, गुलामीतून मुक्त होण्याचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आपल्या शिक्षणविषयक विचारातून व योगदानातून अमलात आणला आहे. म्हणूनच म्हणते की,

हे माणसा,
इथे मी गीत गावे,
असे गीत गावे की, तुझे हित व्हावे,
एकाने रडावे आणि अनेकांनी हसावे,
असे आता कधी न व्हावे.

दलिताचे उद्धरकर्ते, भारतीय संविधानाचे शिल्पकार, धम्मचक्र प्रवर्तनाचे अग्रणी, लोकशाहीचे त्राते, मानवी हक्काचे प्रबळ प्रवक्ते, हिंदू कोड बिलाचे पुरस्कर्ते, बोधीसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक योगदानातून व राजकीय पुढाकारातून अस्पृश्याला निवारण, जातीय संस्थेच्या उद्घाटनाचे कार्य अतिशय निष्ठेने केले. दिनदुबळ्यांचे युगानुयुगाचे अपार दु:ख, अमानुष छळ, समस्या यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. एका दलित वृध्द गृहस्थाच्या शब्दात म्हणायचे तर. "त्यांनी आम्हाला तारांगणात नेवून बसविले" पुढील ओळीतून लक्षात येईल. की अस्पृश्याच्या मनात बाबासाहेबाचे काय स्थान आहे.

हे भगवान भीमा
तू मुक्तिदाता स्पार्टेकस
तत्वज्ञानी सॉक्रेटिस
शब्दप्रभू डेमोस्थेनीस । ॲरिस्टॉटल विधिज्ञ तू
बुद्धीचा तू सॅमसन । निर्मिले त्वा संविधान
केले नवयुगाचे निर्माण । लिंकन–लेनिन आंबेडकर.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व -- डॉ. एलिनॉर झेलिएट अनुवाद वसंत मून
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र) – धनंजय कीर
३. दीपस्तंभ – शिवाजीराव भोसले
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या सामाजिक व राजकिय चळवळी – श्री कृष्णा मेणसे
५. उत्थानगुफा (काव्यसंग्रह) -- यशवंत मनोहर
६. दलितांचे बाबा – आचार्य अत्रे (प्र. के. अत्रे)
७. दलित साहित्याचा इतिहास – म. सु. पगारे



**Advisory Committee**

**Dr. Vikas Singhal**
Assistant Reginal Director,
Indira Gandhi National Open University,
Nagpur.
**Dr. Pranay R. Malviya**
Principle,
Dr. Panjabrao Deshmukh collage of law,
Amravati
**Dr. S. K. Deshmukh**
Principle,
College of Enggneing and Techology,
Akola.
**Dr. Shubhash S. Gawai**
Head, Department of Pol. Science,
Bhartiya Mahavidyalay, Raja Peth,
Amravati.
**Dr. Rama R. Fuke**
Head, Department of Education
Priyadarshini college of Education, Nagpur.
**Prof. Vivek H. Hiware**
Head, Department of English
Shri Shivaji College, Akola

**Peer Committee**

**Prof. Ille C. Gebeshuber**
Professer of Physics
Vienna University of Technology
Austria (Europe)
**Prof. Diana L Gustafson**
Faculty of Medicine,
Memorial University of Newfoundland,
Canada
**Dr Richard Clay**
Department of Art History,
University of Birmingham,
Edgbaston UK
**Dr. Mutavalli Maizoddin Mainoddin,**
Depertment of Marathi
Ranichananama University
Belgaon Karnatak
**Dr. Sanjay M. Ayade**
Govt. College of Education Bilaspur,
Chhattisgarh
**Dr. Dilip Alone**
Depertment of Marathi
L.T.M. College Wani

**Peer Review Committee**

**Dr. Vilas V. Tayde**
Depertment of Marathi
Shri Shivaji Arts, Comm. & Science College,
Akot.
**Dr. Kamlakar Payas**
Depertment of Marathi
Takshashila college, Amravati
**Dr. Sunanda K. Reose**
Depertment of Marathi
Shri Pundalik Maharaj Mahavidyalay
Nandura Railway Dist Buldhana
**Dr. Dnyaneshwar S. Shambhrkar**
Head, Department of Pol. Science,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur.

**Dr. G. L. Gulhane**
Head, Department of Education
Sant Gadage Baba Amaravati University
Amravati.
**Dr. Santosh N. Tade**
Head, Depertment of Economics
Shri Narshing College, Akot
**Dr. Basant Tripathi**
Head, Department of Hindi,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur.
**Dr. Suvarna Shinde**
Head, Department of English,
Arts & Commerce College for Women
Deopur, Dhule.